# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक- 09.04.2025 वार- बुधवार

---

•प्रधानमंत्री मुद्रा योजनेने गेल्या १० वर्षांत असंख्य स्वप्न प्रत्यक्षात आणली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
•राज्याच्या नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी
•नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर प्राधिकरणांना त्यांच्या हद्दीतील शासकीय जमिनी मिळणार
आणि
•एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक धोरणांतर्गत महाराष्ट्र आणि विदर्भ ग्रामीण बँकेचं एकत्रीकरण

**<u>मुद्रायोजनामुंप्रा</u>**

केवळ नोकरी शोधणाऱ्यांऐवजी रोजगार निर्मितीची क्षमता निर्माण करणं हे प्रधानमंत्री मुद्रा योजनेचं उद्दिष्ट असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारनं सुरु केलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला काल दहा वर्षे पूर्ण झाली.
गेल्या दहा वर्षांत या योजनेअंतर्गत ५२ कोटींहून अधिक कर्ज प्रकरणं मंजूर करण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधानांनी त्यांच्या निवासस्थानी योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांचे अनुभव जाणून घेतले. गेल्या १० वर्षांत मुद्रा योजनेने असंख्य स्वप्ने प्रत्यक्षात आणली आहेत असं सांगून पंतप्रधान पुढे म्हणाले…
¬¬

**<u>पंतप्रधान</u>**
**<u>स्क्रिप्ट</u>**

मेरा मक्सद यही है मेरे देश का सामान्य से सामान्य नागरिक वो इतने विश्वास से भर हुवा हो मुसिबते होती है हर एक को होती है जिंदगी मै काठीनायीया होती है लेकीन अगर मोका मिले कठीनायीओंको परास्त कर करके जीवन को आगे बढाये ओर मुद्रा योजांओने यही काम किया है हमारे देश मै बहोत कम लोग है जिनको इन चीजोंकी समज है की सायलेंट ली कैसे रीव्होलुशन हो याह बहोत बडा सायलेंट रीव्होलुशन है

**<u>Intro लाभार्थी</u>**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ घेऊन जळगांवचे रहिवासी महेश कोल्हे यांनी आपल्या आपला व्यवसाय वाढवला आणि इतरांनाही रोजगार दिलं. याविषयी बोलताना ते म्हणाले…

**<u>महेश कोल्हे लाभार्थी</u>**

**<u>स्क्रिप्ट</u>**

प्रसार माध्यमांच्या स्वरूपातून मला ती योजनेची माहिती मिळाली मी बराच अभ्यास करून बँकेत गेलो बँक मनेजर बरोबर बोललो त्यांनी मला ६ लाख रुपये हे पहिली केस म्हणून मंजूर केले गेले या ६ लाखामुळे माझ्या व्यवसायात भरभराट झाली नवीन समान आलं चलन वाढलं माझा कारोबार वाढला ही जी योजना आहे मुद्रा लोन ही सर्वासाठी आहे शहरातल्या मुलांसाठी खेड्यातल्या मुलांसाठी ते तरुण लोकांसाठी सर्वांसाठी आहे त्यांनी या योजनेचा भरपूर लाभ घ्यावा आणि आपला व्यवसाय वाढवावा.

**<u>मंत्रि मंडळ निर्णय महासंवाद</u>**

राज्याच्या नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल मंजुरी देण्यात आली. याअंतर्गत घरांच्या बांधकामांसाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नव्या धोरणात डेपो पद्धत बंद करुन वाळू घाटांची निविदा काढली

जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मंत्रीमंडळाच्या पुढच्या बैठकीत कृत्रिम वाळू धोरण आणलं जाणार असून दगडापासून ही वाळू बनवण्याचं नियोजन आहे. यापुढे सर्व सरकारी बांधकामांसाठी हीच वाळू वापरण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले.

शेतीसंबंधी वादावर तोडगा काढण्यासाठी असलेल्या सलोखा योजनेला २०२७पर्यंत मुदतवाढ देण्याची घोषणाही त्यांनी केली. शेतजमिनीचा ताबा, वहिवाटी, कुटुंबातले वाद अशा प्रकरणावर सलोखा योजनेच्या माध्यमातून तोडगा काढला जातो. राज्यातल्या सिंधी स्थलांतरितांच्या ३० वसाहतींना राज्य सरकारनं मंजुरी दिली.

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आणि पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतल्या शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. नागपूरमध्ये  राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या इमारत बांधकामासाठी राज्य निधीमधून १८४ कोटींच्या निधीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. ही संस्था राज्यातील सर्व घटकांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यासाठी आणि आपत्ती संबंधित विविध विषयावर संशोधन केंद्र म्हणून कार्य करेल.

**<u>मुख्यमंत्री</u>**

राज्यातील सर्वच भागात गुंतवणूकीसाठी अनुकूल वातावरण तयार केलं जात आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षांत राज्याचा संतुलित विकास झाल्याचं दिसेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते काल मुंबईत, इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट २५ या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाचा रोडमॅप मांडला.

महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी नवनवीन संधी निर्माण होत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातही महाराष्ट्र देशात आघाडीवर असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्य सरकारनं केलेऱ्या सामंजस्य करारातील ८५ टक्के करार हे मार्गी लागत असून उर्वरित २० टक्के करार प्रत्यक्षात येण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केलं.

**<u>सामंजस्य करार</u>**

याच कार्यक्रमात मुंबई महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासासाठी, काल राज्याचे 4 कंपन्यांशी ४ लाख ७ हजार कोटींचे विविध सामंजस्य करार करण्यात आले. या करारामुळे, MMR क्षेत्राच्या आणि पुण्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध कंपन्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<u>बँक</u>**

एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक तत्वानुसार ४३ प्रादेशिक बँकांच्या एकत्रिकरणाची अधिसूचना केंद्रीय वित्तीय सेवा विभागानं जारी केली आहे. त्यानुसार, राज्यात विदर्भ प्रादेशिक ग्रामीण बँक, महाराष्ट्र प्रादेशिक ग्रामीण बँकेत विलीन केली जाईल. १ मे पासून हे विलिनीकरण प्रत्यक्षात येईल. या एकत्रित बँकेचं मुख्यालय छत्रपती संभाजीनगरमध्ये असेल.

**<u>गोळेगणी पॅटर्नरायगड</u>**

रायगड जिल्ह्यातल्या डोंगराळ आणि दुर्गम अशा पोलादपूर तालुक्यात, गोळेगणी गावातल्या दोन शेतकऱ्यांनी, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलकुंडाची निर्मिती करुन आपल्या शेतात फळबाग फुलवली आहे. नामदेव येरुणकर आणि सागर मोरे या शेतकऱ्यांनी कोरोना संचारबंदीच्या काळात जलकुंड तंत्रज्ञान आणि कृषी विभागाच्या मार्गदर्शन आणि सहकार्यानं अत्यंत कमी खर्चात जलकुंडाची निर्मिती केली. ऐकू या याविषयी अधिक माहिती कृषी सहाय्यक मनोज जाधव यांच्याकडून

**<u>स्क्रिप्ट</u>**

२०१९ पासून आपण जो नाविन्य प्रयोग कृषी विभागाच्या माध्यमातून केलाय तो पाच बाय पाच दोन मीटर खोलीचा या वर ५०० मायक्रोन चा कागद टाकून यामध्ये ५० हजार लिटर चा पाणी साठा होतो आणि नोव्हेंबर ते मे या कालावधीत फळ पिकांना कलामांना लागेल असं पाणी आपण देतो जेणेकरून कलामांचे जीवन वाढण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे कोकणाचा विचार करता झाकण्याचे दर  कमी असल्याने हे आज काल वरदान ठरत आहे आणि या गावात २६ जलकुंड कृषी विभागाच्या माध्यमातून  पूर्ण झाले आहेत आणि जवळ जवळ २६३०  झाड आंब्याची आणि ५०० ते ६०० कलम काजूची त्या जाल्कुन्दाच्या आधारे जिवंत आहेत आणि त्या मुले दुर्गम भागात सुद्धा आंबा होत आहे, या साठी हे जलकुंड हे वरदान ठरत आहे

**<u>मुख्यमंत्री आपत्कालीन कार्यकेंद्र</u>**

नव तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आपत्कालीन कार्य केंद्र अधिक सक्षम होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मंत्रालयात नवीन तंत्रज्ञानानं अद्ययावत केलेल्या राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**मोहोळ विमानतळ**

पुणे विमानतळावरील धावपट्टी विस्तारीकरणाला मान्यता मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष कामालाही वेग येणार आहे. हे काम जलद गतीनं करण्याचे निर्देश केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल झालेल्या बैठकीत दिले. विस्तारीकरणासाठी आवश्यक असणारं भूसंपादन, लोहगावचा पर्यायी रस्ता आणि इतर तांत्रिक बाबी याबाबत मोहोळ यांनी विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती.

**आठवले जळगाव**

जळगाव मधल्या नव्या वसतीगृहांसाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल दिले. ते काल जळगाव मध्ये झालेल्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीत आठवले यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना, आवास योजना आणि इतर सामाजिक न्याय योजनांचा आढावा घेतला.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल पंजाब किंग्जने चेन्नई सुपरकिंग्ज संघाचा अठरा धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्ज संघाने वीस षटकांत सहा बाद २१९ धावा केल्या. तर प्रत्युत्तरादाखल चेन्नई सुपर किंग्जला २०१ धावा करता आल्या. दुसऱ्या सामन्यात लखनौ सुपर जायंटस् संघाने कोलकाता नाईट रायडर्सचा चार धावांनी पराभव केला. आज संध्याकाळी साडेसात वाजता गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स संघांदरम्यान अहमदाबाद इथं सामना होणार आहे.

**सोलापूर सांगली**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून तापमानात कमालीची वाढ झाली होती; मात्र काल संध्याकाळी अवकाळी पावसानं हजेरी लावली. मेघगर्जनेसह झालेल्या या पावसाने जिल्ह्यातील द्राक्ष, आंबा या फळबांगाना धोका निर्माण झाला आहे. सांगली शहरासह मिरज, तासगाव तालुक्यात वादळी वारा आणि मेघगर्जनेसह  पाऊस झाला.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात सध्या तापमानात लक्षणीय वाढ होत आहे. अकोला इथं काल राज्यातील सर्वात जास्त 44 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची  नोंद झाली. राज्यात येत्या 2-4 दिवसात कमाल तापमानात २ ते ३ अंशांची वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागानं  वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
## नमस्कार.